
# 1 मनीमाऊला शोधा



## चला गाऊ या















ये पटकन **बाहेर**

ये माझ्याजवळ माझी मनीमाऊ


!बघितलंय मी तुला बरणी **खाली**


ओरबडताना


बघितलंय मी तुला गाडीच्या टपा**वर**

खेळताना

ये, ये, ये गं माझ्याजवळ माझी







ये, ये, ये,
ये माझ्याकडे माझी मनीमाऊ !
कधी टोपी**वर** उड्या मारतेस

कधी चटई**खाली** लपतेस आली,
आली, आली तूच माझी लाडकी,
माझी मनीमाऊ !

बच्चों को अभिनय के साथ कविता पाठ करने के लिए कहें। बच्चे चित्रों का अवलोकन करें और बताएँ कि उन्होंने क्या देखा एवं चर्चा करें कि कौन-कौन सी वस्तु ऊपर हैं, कौन-सी नीचे इत्यादि। छुपन-छुपाई के खेल में छिपने के स्थान व परिवेश के जानवरों के रहने के स्थान इत्यादि से संबंधित प्रश्नों के माध्यम से बच्चों को चर्चा में भागीदारी हेतु प्रोत्साहित करें।



© NCERT not to be republished

**कवितेतील चित्रे बघून बरोबर शब्दाभोवती गोल करा।**

अ. लाल चेंडू पलंगा **च्या वर/ च्या खाली / वर** आहे ।
ब. मांजर गाडीच्या **आत/ बाहेर/ वर** आहे।
क. माणूस झाडा **च्या खाली / च्या आत / वर** झोपला आहे।
ड. गाय घरा **च्या आत/ च्या बाहेर / वर** आहे।



## विचार करा आणि


अ. तुम्ही तुमच्या चप्पल कुठे ठेवता? खोली च्या आत / च्या बाहेर?
ब. तुम्ही कचरा कुठे टाकता ? कचराकुंडी च्या आत / च्या बाहेर?



## चला खेळूया - वस्तू शोधूयाढ़ें

मुलांना त्यांचे 2 गट करू द्या। पहिला गट पांढरे खडू , लाल चेंडू वगैरे गोष्टी आसपासच लपवतील आणि दुसऱ्या गटाला त्या शोधायला सांगतील।दुसरा गट शोधात असताना पहिल्या गटातील मुलं त्यांना आत / बाहेर, वर/खाली , जवळ/लांब अशा तोंडी सूचना देऊ शकतात—

उदाहरणार्थ



अ. फळ्या**जवळ** आणि टेबलाच्या **खाली** लपवलेली पांढरी वस्तू शोधा ।
ब. वर्गाच्या **बाहेर** आणि झाडा**खाली** एक लाल रंगाची वस्तू लपली आहे।।

© NCERT not to be republished


## चला खेळू या - चेंडू फेकू या


प्रत्येक मूल नेम धरून चेंडू टोपलीत टाकेल। जेव्हा चेंडू टोपलीत पडेल तेव्हा बाकीची मुले मोठ्याने **आत** असे म्हणतील आणि जेव्हा चेंडू टोपलीच्या बाहेर पडेल तेव्हा **बाहेर** असे म्हणतील।



## चला करू या

अ. ज्या गोष्टी **आत** आहेत त्यांना बरोबर ✓ हे चिन्ह करा।





कृतिसत्र अशाप्रकारे घ्यावे की सर्व मुले भाग घेऊ शकतील। एखादे दिव्यांग मूल असेल तर त्यालाही भाग घेता आला पाहिजे। उदाहरणार्थ, चेंडूला घुंगरू बांधू शकता, तसेच टोपली आतला आणि बाहेरचा भाग वेगळा करू शकता, जेणेकरून चेंडू टोपलीत पडल्यावर विशिष्ट आवाज येईल।

© NCERT not to be republished

ब. ज्या गोष्टी **बाहेर** आहेत त्यांना बरोबर ✓ हे चिन्ह करा।





क. चित्र बघा आणि योग्य शब्दाला बरोबर ✓ हे चिन्ह करा।

अ. मुलगा झाडा **वर** / **खाली** बसला आहे।

ब. पक्षी झाडा **वर** / **खाली** आहेत।



ड. चित्रातील मुलगा हसतोय असे तोंड काढा आणि डोळ्यांवर भुवया काढा।



© NCERT not to be republished

इ. आपला राष्ट्रध्वज , तिरंगा पहा। त्यात किती रंग आहेत? योग्य पर्यायाला बरोबर ✓ हे चिन्ह करा।

i. तिरंग्यात सगळ्यात वर कोणता रंग आहे?

**पांढरा / केशरी / हिरवा**

ii. तिरंग्यात पांढऱ्या रंगाच्या खाली कोणता रंग आहे ?


**गुलाबी/ केशरी/ हिरवा**

iii. तिरंग्यात हिरव्या रंगाच्या वर कोणता रंग आहे?

**पांढरा/केशरी/पिवळा**

iv. तिरंग्यावर अशोक चक्र कुठे आहे ?


**कोपऱ्यात/ मध्यभागी/ एका कडेला**



आपण तिरंगा कधी, कुठे आणि का फडकवतो हे मुलांना सांगा। मुलांना या राष्ट्रीय सणांबद्दल काय वाटते हे सांगायला प्रोत्साहित करा। मुलांना त्यांचा स्वतःचा तिरंगा बनवायला आणि ताठ उभे राहून राष्ट्रगीत म्हणायला सांगा।

© NCERT not to be republished

## झुकझुक झुकझुक आमची आगगाडी चालली



झुकझुक झुकझुक
आमची आगगाडी चालली
कधी डोंगरा**वर** तर कधी शेतातून **खाली**
झुकझुक झुकझुक !
आमची आगगाडी चालली
माझ्या डब्या**आधी** डबे ,
माझ्या डब्या**नंतर** डबे ,
सगळयांनी मिळून साखळी केली
झुकझुक झुकझुक
आमची आगगाडी चालली !
दिसते आभाळ वर आणि नदी
खाली झुकझुक झुकझुक
आमची आगगाडी चालली ।



© NCERT not to be republished

अ. इंजिनाच्या **नंतर** किती डबे आहेत ?
ब. लाल डब्याच्या आधी किती डबे आहेत ?
क. लाल डब्याच्या मागे असलेल्या सगळ्या डब्यांना केशरी रंगाने रंगवा ।
ड. लाल डब्याच्या पुढे असलेल्या सगळ्या डब्यांना निळ्या रंगाने रंगवा।

ज्या मुलांनी यापूर्वी आगगाडीने प्रवास केला असेल त्यांना त्याच्या प्रवासाचे वर्णन करायला प्रोत्साहित करा। ते ऐकताना ज्यांनी असा प्रवास केला नसेल ते हे वर्णन ऐकून वेगवेगळे प्रश्न विचारतील। त्या सगळ्या मुलांना मिळून आगगाडी , तिचा प्रवास यावर चर्चा करू द्या। मुलांना आगगाडीचे चित्र



## चला खेळू

मुलं कविता पाठ करतील आणि ती म्हणत एक खेळ खेळातील। ज्यात ते एकमेकांच्या खांद्यांना पकडून त्यांची आगगाडी बनवतील आणि प्रत्येकजण स्वतःच्या मागे आणि पुढे कोण आहे हे सांगतील?




सुवाली आणि रोहित काही वस्तूंचे गट करत आहेत।





अशाच प्रकारे सगळ्या मुलांना वेगवेगळ्या वस्तूंचे उदा। बिया, पाने, मणी इत्यादी यांचे वर्गीकरण करायला सांगा।



## चला करू या

सुवालीने सगळी बटणे तीन गटात विभागून ठेवली आहेत—



सुवालीने अशाच प्रकारचे गट का बनवले?

सुवालीला वेगवेगळ्या पद्धतीने गट बनवायला तसे चित्र काढून मदत करा—

© NCERT not to be republished



## प्रकल्प कार्य

मुलांना वर्गातील कपाट लावायला सांगा। मुलांना कपाट लावताना स्थानदर्शक शब्दांचा वापर करून वस्तू लावण्यास सांगा। उदाहरणार्थ -सगळ्यात खालच्या कप्प्यात दोन वस्तू ठेवा, सगळ्यात वरच्या कप्प्यात एक वस्तू ठेवा इत्यादी।